## प्र क र ण ५ वे

## गुरुवर्य शामराव देसाई यांची पत्रकारिता

# प्र क र ण ५ वे

## गुरुवर्य शामराव देसाई यांची पत्रकारिता

बहुजन समाजात जागृती करावयाची असेल तर स्वतंत्र पत्रक हवे या विचारांतून कै. भुजंगराव केशवराव दळवी, धारवाड डिस्ट्रिक्ट जज्ज, कै. शामराव संताजीराव भोसले, कोल्हापूर हायकोर्ट ज्ज्ज, कै. रावसाहेब देवराव अप्पासाहेब बिरंजे, कै. शामराव गोविंदराव देसाई. ही मंडळी एकत्र जमली व " श्री शिवाजी प्रिंटींग प्रेस असोसिएशन " ही संस्था स्थापन केली. थोडा पैसा ही जमविला. त्यानंतर कै. शामराव देसाई आणि रावसाहेब बिरंजे यांनी कोल्हापूरचे राजे शाहू महाराज यांची भेट घेऊन सर्वतोपरी सहाय्य मिळविले. संपूर्ण तयारी झाली आणि ९ मे १९२१ ला शिवजयंतीच्या मुहूर्तावर राष्ट्रवीर पत्रक सुरू केले. [१]

शामराव संताजीराव भोसले बी.ए., एल.एल.बी., हे राष्ट्रवीरचे पहिले संपादक. " ब्राम्हणेतर पक्षाचे मुखपत्र " ही त्या पत्रकावरील पहिली ओळ. त्यानंतर शिवरायांची मुद्रा -

" प्रतिपचंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनो शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।। "

या मुद्रेखाली शिवरायांची छोटी प्रतिमा व तलवार छापली जाई. शिवाजी आमुचा राणा. मराठी आमुचा बाणा. ही वृत्ती राष्ट्रवीरच्या मागे होती. [२]

राष्ट्रवीरची लेखणी म्हणजे एक तीक्ष्ण तलवार होती. प्रवाह-पतितता, वृत्तपत्रीय काळा वैचारिक विचार, मतविक्रया पासून राष्ट्रवीरचे लिखाण पूर्णत: अलिप्त होते. [३] हे स्वविचाराचे पत्रक असल्याने लेखणी खडी आणि धारदार होती.

राष्ट्रवीरचे स्वरूप बातमी पत्रापेक्षा विचारपत्र असे होते. गतानुगतिक दारिद्र्याने पीडलेल्या समाजासमोर परंपरेला विरोध करून नव्या समाज निर्मितीचा आलेख मांडणारे वृत्तपत्र ही राष्ट्रवीरची भूमिका होती. आज देखील राष्ट्रवीर खंबीरपणे सत्यशोधन करीत आहे. त्याचे ध्येय व स्वरूप तत्वमूलक आहे.[४] शिवाजीची मुद्राधारण करून शिवाजीचा पक्ष व धर्म राष्ट्रवीर मुख्यत: मांडतो. राष्ट्रवीर हे नामाभिधान केवळ छत्रपती शिवाजी महाराजाना उद्देशून आहे. म्हणून राष्ट्रवीरला एक तत्वसंस्था मानता येईल. राष्ट्रवीरचा सामाजिक पवित्रा सत्यशोधक समाजाला अनुसरून आहे. धर्म, कर्म आणि व्यवहार या व क्षेत्रात सामान्य जनता पिळली जाऊ नये म्हणून राष्ट्रवीरने आज पर्यंत अविरत कष्ट घेतले आहेत. या मुळे जनतेचा आत्मविश्वास सांभाळू शकले. थोडक्यात राष्ट्रवीर म्हणजे एक वैचारिक चळवळ, सत्यमत प्रतिपादन व प्रसार यांचा सुरेख संगम.[५]

राष्ट्रवीरचे ध्येय पहिल्या अंकातच संपादकानी स्पष्ट केले होते. ते लिहितात -

> " राष्ट्रवीर म्हणजे समाज जागृतीचे साधन राष्ट्रवीर केवळ ब्राम्हणांच्या अन्यायाचा बी-मोड करण्यासाठी नसून ज्या ज्या व्यक्तीकडून अगर व्यक्ती समूहाकडून अन्याय घडला असेल किंवा घडेल त्या व्यक्ती अगर समूहास अन्यायासहित समरांगणावर खेचून आणून त्यांचा पूरा परामर्श घेण्यासाठी, सुधारलेली राष्ट्रे जे स्वातंत्र्य, सुख अनुभवित आहेत ते स्वातंत्र्य स्वदेशासही प्राप्त होईल अशा मताचा प्रसंग ओळखून जबाबदारपणे प्रसार करण्यासाठीच राष्ट्रवीर अवतरला आहे".[६]

या वरून बहुजन समाजाची सर्वांगीण उन्नती करणे हे राष्ट्रवीरचे धोरण होते हे स्पष्ट होते. या करीता राष्ट्रवीरने समाजासमोर सतत विधायक कार्यक्रम ठेवले तर भांडवलशाहीच्या कबजात गेलेल्या सत्ताधिश सरकारवर टीकेची झोड उडविली. सरकारी कोलदांडयांना चांगली उत्तरे दिली आणि जनतेच्या गा-हाण्याकडे सरकारचे लक्ष वेधले.

राष्ट्रवीर वृत्तपत्रकाचा दृष्टीकोन हा गरीब व सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याने भरलेला होता. त्यामुळे लिखाण मार्गदर्शक असे. लिखाणाचे विषय सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन आणि दीर्घकालीन मूलभूत प्रश्नासंबंधी असत. त्या संबंधीचे विचार राष्ट्रवीर मोठ्या पोटतिडकीने मांडत असे. तथापि निव्वळ विचार मांडून स्वस्थ बसण्याचा लोकिका सुधारकवाद राष्ट्रवीरने कधी ही जोपासला नांही. तर या विचारांचा मागोवा घेत समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रकारची कृती ही केली. या विचारकृतीची विभागणी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, अस्पृश्यता निवारण इत्यादी विभागात करता येईल.

संपादक शामराव गुरुजी :

सन १९२८ पासून शामराव गुरुजी राष्ट्रवीरचे संपादक झाले. यापूर्वी जरी ते संपादक नसले तरी लिखानाचे संपूर्ण काम तेच करत होते. त्यानी हे पत्रक पोटाचा व्यवसाय म्हणून कधी चालविले नांही तर प्रचाराचे साधन म्हणून त्याचा उपयोग केला.[७] नाना संकटे आली असतानाही त्यानी वृत्तपत्राचा दर्जा घसरु दिला नांही. उलट तो वाढविला आणि बहुजन समाजाचा वजनदार पत्रक म्हणून मान संपादन केला. या पत्रकाव्दारे समाजात वैचारिक क्रांती घडवून आणली. सहकार्याने आर्थिक शक्ती व संघटना वाढविल्या. "बेळगांव शेतकरी शिक्षण समिती" ची स्थापना करुन प्राथमिक शाळा, प्रौढ शाळा,

व हायस्कूल्स् सुरु केली. तर धार्मिक विधि बाबत ब्राम्हणांची मक्तेदारी मोडून काढली. समाजाचे परावलंबीत्व दूर केले व त्यांच्यात स्वाभिमान निर्मिती करुन वैचारिक क्रांती घडवून आणली.[८]

त्यांच्या संपूर्ण चळवळीत सत्यशोधक समाजाचा सात्त्विक आशय होता. जनतेतील भोळाभाव नाहीसा करणे हे त्यांच्या लेखणीचे ध्येय होते. त्यांचे लिखाण काळाला अनुसरुन होते. या लिखाणाने काळाची गरज त्यानी भागविली.[९] त्यांचे राजकारणी लेख तिखट असत. ते इतरांना लवकर झोंबत. या बाबतीत कै. भास्करराव जाधव नेहमी म्हणत असत. " राष्ट्रवीर हा चांगले राजकारण लिहि असतो".[१०]

शामराव गुरुजींनी चालविलेले हे पत्रक जी हुजूर वृत्तीचे नव्हते. हर एक बाबतीत ते बहुजन समाजाची बाजू मांडित असत. त्यानी काळाला अनुसरुन व तत्वनिष्ठपणे समाजपरिवर्तन केले त्यामुळे राष्ट्रवीरचा दरारा कायम राहिला. त्यांच्या राष्ट्रवीरचे आचार-विचार समाजोन्नतीचे होते. तो पक्षीयतेला बांधलेला नव्हता. यामुळे शामराव गुरुजीची स्वपक्षावरही वारंवार टीका होई. थोडक्यात त्यांची लेखणी कुणाची गुलाम नव्हती.

" करबंदी आधी का खंड बंदी " ही शेतक-यांकरीता लेखमाला त्यानी सुरु करुन खंड देणे शेतक-यांना किती घातक आहे या विषयी १९३२ ला त्यानी आवाज उठविला. तर कामगार चळवळीतही पुढाकार घेतला. या वरुन गुरुजींची लेखनी समाजवादी होती हे स्पष्ट होते.[११]

शामराव गुरुजी राष्ट्रवीर मध्ये " तरुण मराठा " व स्फूट लेख या नांवाखाली लिखान करत असत त्यांच्या लिखानात अतएव, एवंच, प्रवाहपतीतता, बामण हे शब्द सर्रास सापडतात. त्यानी आपल्या लिखानांत ब्राम्हण वर्गाने स्वीकारलेल्या अयोग्य आणि समाज-विघातक

विचारांचा अत्यंत परखड शब्दात समाचार घेतलेला आहे. ही शब्द योजना तत्कालीन ब्राम्हणी विचारांना असलेल्या विरोधाची निदर्शक आहे. गुरुवर्य शामराव देसाई निव्वळ ब्राम्हण विचारांना आणि प्रवृत्तीना विरोध करुन थांबले नांहीत तर ज्या ब्राम्हणेतर समाजाचे प्रबोधन करण्याचे त्यानी ठरविले होते त्या समाजातील अवगुण आणि वाईट चालीरीती यांच्यावर ही त्यानी कडकपणे टीका केलेली आहे. ही टीका करत असताना लेखक या नात्याने त्यानी विविध उपायांचा अवलंब केल्याचे दिसून येते. विशेषत: गोष्टी व चुटके सांगून त्यानी बहुजन समाजाचे प्रबोधन केले. हे काम करीत असताना लेखांची भाषा सर्वसामान्य लोकांना समजणारी असावी याची काळजी वृत्तपत्रीय लेखण करीत असताना त्यांनी सतत बाळगली होती. विरोधकावर हल्ला करत असतेवेळी ते अगदी निर्भिडपणे करत असत. 'दुतोंड्या बामण' या लेखात ते लिहितात -

> " बामण म्हणजे दुध पिऊन विष ओकणा-या सापाच्या जातीचे आहेत ही बात समाजाच्या उपयोगी मागे कधी पडली नांही व आता पडत नांही". [१२]

या लिखाणावरुन त्यांच्या स्वभावाची स्पष्ट कल्पना येते. ब्राम्हणेतरांना शूद्र आणि अतिशूद्र म्हणून कमी लेखणा-या, त्यांना शिक्षणा पासून वंचित ठेवणा-या ब्राम्हणी परंपरेची इतर समाजापासून दूर राहून त्यांच्याकडे तुच्छतेने पाहणा-या तत्कालीन ब्राम्हणी प्रवृत्तीवर अशारीतीने शामराव गुरुजींनी प्रखर टीका केली होती.

त्यांच्या लिखाणात आणि बोलण्यात स्पष्ट वक्तेपणा होता. सन १९३८ ला रंगूबाई जेव्हा आपला न्यू पॅलेस देणगीदाखल शामराव गुरुजींच्या हाती द्यावा का देऊ नये या संभ्रमात पडल्या होत्या.

त्यावेळी शामराव गुरूजींनी स्पष्ट बजाविले -

> " ज्याना दानधर्म करायचा असतो त्यानी आपण आजच मरणार आहोत असे समजून तो केला पाहिजे आणि आपण खूप वर्षे जगणार आहोत म्हणून उद्योग करून धन संचय केला पाहिजे". [१३]

यावरून गुरूजींच्या स्पष्ट वक्तेपणाची कल्पना येते.

शामराव गुरूजींनी आपल्या लेखणीद्वारे शिवरायांचा आदर्श जनतेपुढे ठेवला होता. शिवाजी म्हणजे " हिंदुस्थानचो हिंम्मत मर्दाई " असे ते ठासून सांगत असत. इ.स. १९३९ मध्ये पुण्याच्या सरस्वती सिनेटोन या ब्राम्हण कंपनीने भगवाझेंडा चित्रपट तयार करून त्यामध्ये शिवाजी पेक्षा रामदासाला जास्त महत्व देण्यात आले होते. यावेळी शामराव गुरूजींनी खालील शब्दांत चोख उत्तर दिले -

> " मराठ्याना पराक्रमासाठी बावा बैराग्यांच्या आशिर्वादाची गरज नसते. बामणांच्या या कृत्याच्या बुडाशी दुष्मनगिरीचा दुष्ट हेतू दडलेला दिसतो. अशा बुवाबाजीचा बडेजाव वाढविणे म्हणजे देशाच्या हिंम्मत मर्दाईची खच्ची करणे होय. संपत्ती, सत्ता किंवा अंमल हे अंगच्या कर्तबगारीवर मिळत असतात ही कर्तबगारी कोणाच्या आशिर्वादाने उत्पन्न होत नसते".

गुरूजी पत्रात एवढे लिखाण करून थांबले नाहीत तर जनशक्तीच्या सहाय्याने तो चित्रपट कायमचा बेकायदेशीर ठरविला. [१४]

शामराव गुरुजीनी आपल्या लिखाणात सांस्कृतिक सुधारणांनाही जास्त महत्व दिले होते. लग्ने कमी खर्चात करावीत. मूर्तीपूजा करू नये. देवदासी, मुरळ्या सोडू नयेत, विधी समाज पुरोहिताकडून करवून घेण्यात यावा. या विषयाना अनुसरुन त्यांचे लिखाण असे. त्याच बरोबर ते अनुकरनिय पध्दतीना ही प्रसिध्दी देत. अशा पध्दतीने त्यानी धार्मिक अज्ञानाच्या निद्रावस्थेतून समाजाला खडबडून जागे केले आणि नांगराचे रुमणे, तलवार, तराजू, आणि लेखणी ही आयुध्ये ब्राम्हणेतरांच्या हाती दिली. [१५]

या पत्रकी प्रचाराने त्यानी समाजात शैक्षणिक प्रसार केला. सामान्य जनता विवेकी व्हावी ही त्यांची दृष्टी होती. विरोधकावर हल्ले चढवित असताना त्यानी अनेक विधायक विचार समाजापुढे मांडले " आपला आपण उध्दार करून घेतला पाहिजे पुढारलेल्या जातीच्या जुलमाच्या ठिकऱ्या उडविल्या पाहिजेत". असा सल्ला ही दिला. [१६]

शामराव गुरुजीची भाषा चिंतनीय वाटते. त्यानी आपली साहित्यिक कला कलेसाठी वापरली नाही तर समाज जागृतीसाठी वापरली त्यांच्या कलेने जीवन घडविले. यामुळे तत्कालीन समाज-सुधारकावर ही राष्ट्रवीरचा चांगला परिणाम झालेला होता. या बाबतीत महर्षी शिंदे म्हणतात -

> " राष्ट्रवीरचे संपादक शामराव देसाई यानी आपल्या एका जुन्या जमान्याच्या स्नेहाच्या दिवाणखाण्यांत शेजारच्या बऱ्याच कुटूंबाना जमविले. माझ्यामते अशा कोपऱ्यातील कौटुंबिक पूजेची अध्यात्मिक किंमत चव्हाट्यावरील हजारो गर्दीच्या व्याख्यानाहून हजारो पटीने अधिक आहे". [१७]

कै. ना. यशवंतराव चव्हाण यांच्या मनावर ही राष्ट्रवीरचा प्रभाव पडलेला होता. ते म्हणतात -

" मी मराठी सातवी इयत्तेत शिकत होतो. त्यामुळे मला समजत होते. वृत्तपत्र वाचनाचीही सवय लागली होती. परंतु त्या वेळी जी वृत्तपत्रे मला वाचायला मिळत असत ती म्हणजे पुण्यांत प्रसिध्द होणारा "विजयी मराठा" आणि बेळगांवहून प्रसिध्द होणारा " राष्ट्रवीर !" ही ब्राम्हणेत्तर चळवळीचा पुरस्कार करणारी होती. ती एकाच व एकांती विचाराचा परखड प्रचार सतत करत असल्यामुळे त्यांचा थोडाफार परिणाम मनावर झालेला होता'. [१८]

ब्राम्हणेत्तर चळवळीतील तथ्य यशवंतराव चव्हाणांना नंतरच्या काळांत पटल्याचे दिसते. विशेषत: कॉंग्रेस पक्षाने शेतक-यासंबंधी आणि शेतीसंबंधी कांही सुधारणा स्वीकाराव्या या कै. माधवराव बागल यांच्या म्हणण्यास जो विरोध झाला त्या वरुन नाण्याची दुसरी बाजू यशवंतराव चव्हाणाना नंतर पटल्याचे दिसून येते. [१९]

दुस-यांदा महर्षी शिंदे शामराव गुरुजींच्या उत्कृष्ट संपादकत्वाची साक्ष देत असतेवेळी रा. ना. चव्हाण, वाई यांना सल्ला देतात -

" श्री शामरावांचे पत्रसंचलन कणखर आहे. त्यात तुझा मजकूर धाड" [२०]

इ. स. १९४८ ला बेळगांव येथे " पत्रकार संम्मेलन " भरले होते. याला जोडून " महाराष्ट्र दर्शनाचे " प्रदर्शन होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन कै. शामराव गुरुजींनी केले. यावेळी आचार्य प्र. के. अत्रे म्हणाले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

" शामराव यांचे व्यक्तिमत्व मोठे ठसठशीत
व आकर्षक आहे. बेळगांवातले सर्वांत श्रेष्ठ
पत्रकार तेच आहेत. बेळगांवातील महाराष्ट्रीय
बहुजन समाजाचे नेतृत्व निःसंदिग्धपणे
त्यांच्याकडेच जाते". [२१]

वरील महननीय व्यक्तींच्या उद्गारावरून शामराव गुरूजींच्या आदर्श पत्रकारितेचे दर्शन घडते.

शामराव गुरूजींनी हे सामाजिक कार्य करत असतेवेळी सत्ता, संपत्ती, कीर्ति याकडे कधी लक्ष दिले नाही. सतत विधायक कार्य ते करत राहिले. हे करत असते वेळी कठीण प्रसंगी ते कधी ढळले नाहीत की विचलित झाले नाहीत. त्यांनी स्वतःच्या दृष्टीने आणि बुध्दीने स्वतःचे स्थान निर्माण केले होते. [२२] आणि बहुजन समाजाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला होता.

शामराव गुरूजींची ही सामाजिक चळवळ समता आणि बहुजन समाजाची शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक प्रगती करणे यावर आधारीत होती. आज देखील समाजावर धर्माचा व धार्मिक तत्वांचा अवास्तव पगडा पडलेला आहे. आणि या पगड्यामुळे अंधश्रध्दा आणि दैववाद यांची जोपासना होत आहे. धार्मिक संकल्पनांचा परिणाम किती विघातक असतो याची आज आपल्याला पूर्ण कल्पना आलेली आहे. समाजाची बांधणी धर्म-निरपेक्ष तत्वावर होणे भारताच्या अस्तित्वाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. आणि या विचारांची सुरवात सत्यशोधकी वाङमयात आणि शामराव गुरूजींच्या लिखाणात आढळते. या वरून शामराव देसाई यानी पत्रकार या नात्याने प्रतिपादन केलेली तत्वे आजच्या भारतीय समाजाच्या विविध प्रश्नांच्या संदर्भात किती समर्पक आहेत हे स्पष्ट दिसून येते.

xxxxx

## टीपा


१. द. स. दरेकर, बहुजन समाजातील कर्मवीर (पुणे : सौ.कमलाबाई दत्तात्रय दरेकर, १९४४). पृ. १३०/३१.

२. रा. ना. चव्हाण, "संपादक शामराव", साप्ताहिक राष्ट्रवीर (बेळगांव : संचालक राष्ट्रवीर प्रेस, १९८१).पृ. २/३.

३. राष्ट्रवीर, २६ मे १९५०.पृ. ४.

४. राष्ट्रवीर विशेषांक, १९६१. पृ. १७.

५. राष्ट्रवीर, ९ डिसेंबर १९८१.पृ. २.

६. राष्ट्रवीर, ९ मे १९२१.पृ. ६.

७. माधवराव बागल, बहुजन समाजाचे शिल्पकार (पुणे : ग.ल. ठोकळ, ठोकळ प्रकाशन, १९६६).पृ. १९.

८. तत्रैव., पृ. १६०.

९. तत्रैव., पृ. १६५.

१०. राष्ट्रवीर, ३० डिसेंबर १९८१.पृ. २/३.

११. रा.ना.चव्हाण, "समाजवादी शामराव" राष्ट्रवीर, ३० डिसेंबर १९८१. पृ. २/३.

१२. राष्ट्रवीर, ४ एप्रिल १९३३.पृ. २.

१३. कृष्णा मेणसे, गुरुवर्य शामराव गोविंदराव देसाई व्यक्ती आणि कार्य (बेळगांव : एस.एम.पवार, १९६४).पृ. ७.

१४. राष्ट्रवीर, २५ आक्टोबर १९३९.पृ. ५.

१५. कृष्णा मेणसे, गुरूवर्य शामराव गोविंदराव देसाई व्यक्ती आणि कार्य
पृ. ६.

१६. राष्ट्रवीर, १५ जानेवारी १९६४.पृ.५.

१७. रा. ना. चव्हाण, "महर्षी शिंदे व शामरावजी"
राष्ट्रवीर, 30 डिसेंबर १९८३.पृ.२/३.

१८. यशवंतराव चव्हाण, "कृष्णा काठ" (पुणे : प्रेस्टीज पब्लिकेशन, १९८४).
पृ. 30/३१.

१९. तत्रैव., पृ. १०४.

२०. राष्ट्रवीर, २६ मे १९५०.पृ. ४.

२१. कृष्णा मेणसे, गुरूवर्य शामराव गोविंदराव देसाई व्यक्ती आणि कार्य.पृ. ४.

२२. राष्ट्रवीर, ८ डिसेंबर १९७१.पृ. ४.